ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख १ जून, १९६० | अंक २२

## विविध माहिती

**पुरांबद्दल इषारा देणारें केंद्र**—नद्यांना येणाऱ्या पुराबद्दल आगाऊ इषारा देणारें केंद्र पंजाब राज्य सरकारनें स्थापन करण्याचें ठरविलें आहे. अशा प्रकारचें हें दुसरें केंद्र होईल. १९५८ सालीं अशा प्रकारचें पहिलें केंद्र दिल्ली येथें स्थापन करण्यांत आलें. ह्या केंद्रानें यमुना नदीला येणाऱ्या पुराची माहिती गोळा करून पूर येण्याच्या आधीं दोन दिवस इषारा दिलेला आहे.

**बिहारमधील पाणीपुरवठ्याची योजना** — भारताच्या नियोजनसमितीनें दक्षिण बिहारमधील शोण नदीवरील धरणाच्या योजनेला मान्यता दिली आहे. ह्या योजनेच्या पूर्तीसाठी १४ कोटी रुपये खर्च येईल; आणि धरणांत सांठविलेल्या पाण्याचा ८ लाख एकर शेत-जमिनीला फायदा होईल. त्याशिवाय पुरावर नियंत्रण ठेवण्यासहि तिचा उपयोग होईल.

**भारताचा निकृष्ट प्रतीचा आहार** — संयुक्त-राष्ट्र संघटनेला भारतासह ४० देश आपली आंकडेवार माहिती पुरवितात. संघटनेच्या १९५९ च्या वार्षिक आंकडे बुकावरून असें दिसून येतें कीं, भारताचा आहार सगळ्यांत निकृष्ट दर्जाचा आहे. १९३४–३८ ह्या कालांत हिंदी नागरिक, १,९५० कॅलरीज पुरविणारें अन्न घेत असे. १९५४–५६ ह्या कालांत तो १,८९० कॅलरीज पुरविणारें अन्न घेत होता.

**जपानी कंपनीची तयारी**—गुजरात सरकारनें राज्याचें औद्योगीकरण घडवून आणण्यासाठी जे प्रयत्न चालविले आहेत त्याबद्दल एका जपानी कंपनीनें आस्था दाखविली आहे. जपानमधील ही प्रमुख कंपनी असून गुजरातमध्यें एक मोठा कारखाना काढण्याची आपली तयारी असल्याचें तिनें गुजरात सरकारच्या उद्योगखात्याला कळविलें आहे.

**इंजिनावरील नवे दिवे**—यादवपूर येथील मध्यवर्ती संशोधनसंस्थेनें रेल्वे एंजिनावर लावण्यासाठी नव्या प्रकारचा दिवा शोधून काढला आहे. हा दिवा सध्यांच्या दिव्यापेक्षां तिपटीनें झगझगीत असून त्यामुळें गाडी चालविणें ड्रायव्हरच्या दृष्टीनें अधिक सुरक्षित होईल. यादवपूर येथील संशोधनसंस्थेंत कांचेविषयीं प्रयोग करण्यांत येत असतात.

**चहाच्या मळ्यावरील कामगार**—करीमगंज विभागांतील चहाच्या १४ मळ्यांवरील कामगारांना कामावरून कमी केल्याच्या नोटिसा देण्यांत आल्या आहेत. ह्या भागांतील चहाची लागवड पाण्याअभावीं वाळून चाललेली आहे. त्याशिवाय चहाच्या कारखान्यांतून कच्च्या मालाचाहि तुटवडा भासत आहे. त्यामुळें कामगारांना कमी करण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता.

**भावनगर येथें बालभवन**—भावनगर येथें राजकोटमधील बालभवनाप्रमाणेंच एक बालभवन लवकरच स्थापन करण्यांत येणार आहे. बालभवनाच्या इमारतीसाठी १ लाख रुपये खर्च येईल. गुजरात राज्य सरकारनें ह्या कामासाठी ३२,००० रुपये मंजूर केले आहेत. तितकीच रक्कम भावनगर नगरपालिका देईल व बाकी सार्वजनिकरीत्या जमविण्यांत येईल.

**गुजरातमधील रस्त्यांचा विकास**—गुजरात सरकारच्या सार्वजनिक बांधकाम खात्यानें राज्यांतील सडका व रस्ते ह्यांचा विकास करण्याची एक योजना आंखली आहे. कच्छ, सौराष्ट्र आणि गुजरात ह्या तिन्हीं भागांत नवीन रस्ते बांधण्यांत यावयाचे असून त्यासाठी सुमारें १॥ कोटि रुपये खर्च करण्यांत येतील. कामाची सुरुवात शक्य तर ह्याच वर्षीं करण्यांत येईल.

**वृत्तपत्रांचें राष्ट्रीयीकरण**—संयुक्त–अरब प्रजासत्ताक राज्याचे अध्यक्ष मि. नासर ह्यांनीं राज्यांतील वृत्तपत्रांचें राष्ट्रीयीकरण करणारा हुकूम काढला आहे. आतां इजिप्तमधील सर्व वृत्तपत्रें नॅशनल युनिअन पार्टीच्या मालकीचीं झालीं आहेत. ह्या हुकुमानें फारसा बदल झालेला नाहीं. कारण, खाजगी मालकीच्या वृत्तपत्रांनीं आधींच सरकारी धोरणाला पाठिंबा देण्यास प्रारंभ केलेला आहे.

**आंध्र सरकारच्या कचेऱ्या**—आंध्र सरकारच्या कचेऱ्यांची नवी इमारत ज्युबिली हिल्स ह्या उंचवट्याच्या जागीं बांधण्यांत येणार आहे. ही जागा समुद्रसपाटीपासून १,२०० फूट उंचीवर असून तिचा विस्तार ५,००० एकरांवर पसरलेला आहे. इमारत सहा मजली होणार असून ती बांधण्यासाठी १·५ कोटी रुपये खर्च येणार आहे.

**विमा कॉर्पोरेशनचे अधिकारी**—आयुर्विमा कॉर्पोरेशनमध्यें काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना शिक्षण देण्यासाठी नागपूर येथें एक कॉलेज स्थापन करण्यांत आलें आहे. अशा प्रकारची ही पहिलीच संस्था असून ७५ अधिकाऱ्यांचा एक गट ह्याप्रमाणें ५२५ अधिकाऱ्यांना ह्या वर्षीं शिक्षण देण्यांत येणार आहे. कॉलेजाचें उद्‌घाटन कॉर्पोरेशनच्या अध्यक्षांनीं केलें.

**साखरेच्या उत्पन्नांत वाढ**— ७ मे, १९६० पर्यंत साखरेच्या चालू वर्षाच्या हंगामांत २३·५० लाख टन साखरेचें उत्पादन करण्यांत आलें. गेल्या हंगामांतील ह्याच कालांतील उत्पादनापेक्षा हें उत्पादन ४·६२ लाख टनांनीं अधिक आहे. गेल्या हंगामांत मेच्या पहिल्या आठवड्यापर्यंत १८·८८ लाख टन व हंगामाच्या अखेरीला १९·१९ लाख टन उत्पादन झालें होतें.

## "सांडू" त्रैमासिक

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रा. लि. चा ६० वा वाढदिवस नुकताच साजरा झाला. ह्या सुप्रसिद्ध औषधी कारखान्याचे संस्थापक श्री. दत्तात्रेय कृष्ण हे होते व त्यांनी १० मे, १८९९ ह्या दिवशीं ठाकूरद्वार, मुंबई येथें कारखाना सुरू करून औषधनिर्मितीच्या एका नव्या उपक्रमाचा श्रीगणेशा केला. परकीय सत्ता व जनतेचें औदासिन्य ह्यांना टक्कर देऊन कारखान्याला हा सुवर्णदिन प्राप्त झाला. संस्थापकांच्या जनहितसाधक पावलावर पाऊल ठेवून, सांडू बंधूंनीं नवमहाराष्ट्राच्या मंगल सूर्योदयाच्या वेळीं "सांडू" ह्या त्रैमासिकास प्रारंभ केला आहे. "सामान्य जनतेच्या दैनंदिन जीवनांत निरोगी राहण्याच्या दृष्टीनें कसें वागावें तें सांगणें, आयुर्वेदीय विद्यार्थ्यांच्या पुस्तक विषयक अडचणी उपयुक्त भागाबद्दल विस्तारपूर्वक लिहून दूर करणें, वैद्यांना दैनंदिन व्यवसायांत शास्त्रशुद्ध मार्गदर्शन करणें, वेळोवेळीं उत्पन्न होणारे वैद्यकविषयक सामाजिक व इतर प्रश्न ह्यांचा ऊहापोह करणें, हें प्रस्तुत त्रैमासिकाचें उद्दिष्ट आहे. "सांडू" त्रैमासिकाच्या पहिल्या, नमुना अंकाचें स्वरूप आकर्षक असून त्रैमासिकाची उपयुक्तता सिद्ध करणारें आहे. (संपादक: वे. भा. द. गोडबोले, आयुर्वेदाचार्य; उपसंपादक: वे. प्र. गो. सांडू, आयुर्वेद-प्रवीण.)

---

## रूरकेलाच्या कारखान्यावर फौजदारी करा!
### फॅक्टरी कायद्याखाली नोंदण्यास विलंब

राज्य सरकारनें अनेक वेळां आठवण करूनहि आणि 'शो कॉज' नोटिसा काढल्यावरहि रूरकेलाच्या पोलाद कारखान्यानें अद्याप कारखाना फॅक्टरी ॲक्टाखाली नोंदलेला नाहीं! एका आठवड्यांत हिंदुस्थान स्टील लिमिटेडनें हा कारखाना नोंदला नाहीं, तर त्यावर फौजदारी दावा करावा, असें ओरिसा कामगार सल्लागारसमितीनें राज्य सरकारला सांगितलें आहे. फॅक्टरी ॲक्टाखाली नोंदण्याची कायदेशीर जबाबदारी हिं. स्टील लिमिटेडनें न मानल्याबद्दल इंटक आणि हिंद मजदूर संघ ह्या दोन्हीं कामगार संघटनांनीं तक्रार केल्यामुळें सल्लागार समितीला हा निर्णय घ्यावा लागला. सरकारी क्षेत्रांतील ह्या पोलादाच्या कारखान्याच्या ढोबळ चुकांकडे सरकार कानाडोळा करतें, पण टाटा कंपनीनें वेळेवर रिन्युअल फी दिली नाहीं म्हणून तिचेवर फौजदारी करण्यांत आली; सरकारी व खासगी क्षेत्रांतील सापत्नभावाचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे.

---

## राष्ट्रकुलांतील मध्यवर्ती बँकांच्या गव्हर्नरांचा विचारविनिमय

राष्ट्रकुलांतील १२ सेंट्रल बँकांच्या गव्हर्नरांची परिषद् दिल्ली येथें चालू आठवड्यांत भरणार आहे. बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर अध्यक्षस्थानीं असतील. चर्चेचे विषय आगाऊ ठरविण्यांत आलेले नाहींत आणि ठरावहि मंजूर केले जाणार नाहींत. स्टर्लिंग गटांतील परिस्थितीची सर्वसाधारण चर्चा परिषदेंत होईल. सेंट्रल बँकर्स ट्रेनिंग कॉलेजची उपयुक्तता कशी वाढवितां येईल, ह्याचा विचारहि परिषद् करील. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर श्री. एच. व्ही. आर. अय्यंगार हे परिषदेंत भाग घेतील. अशा परिषदा पूर्वी दोनदां-१९५१ मध्यें आणि १९५६ मध्यें-भरविण्यांत आल्या होत्या. घाना, नैजेरिया आणि मलाया ह्यांच्या सेंट्रल बँका नव्याच असून त्यांचे गव्हर्नर परिषदेस प्रथमच उपस्थित होत आहेत.

## अणुशक्तीवर वीज उत्पन्न करणारें पहिलें केंद्र

अणुशक्तीच्या साह्यानें वीज उत्पन्न करणारें भारतामधील पहिलें केंद्र मुंबईपासून ६० मैलांवर असलेल्या ठाणे जिल्ह्यांतील एका गांवीं उभारण्यांत येण्याचा संभव आहे. महाराष्ट्रांतील तारापूर हें तें ठिकाण होय. गुजरातमधील काकापार अगर डहाणू ह्या ठिकाणीं हें केंद्र उभारण्याचें घाटत होतें. पण भारताच्या अणुशक्तीमंडळानें तांत्रिक व इतर कारणांसाठी अखेर वरील ठिकाणच पसंत केल्याची वार्ता आहे. केंद्र महाराष्ट्रांत उभारलें गेलें तरी त्याचा फायदा गुजरातलाहि मिळणार आहे. ह्या केंद्रांत सुमारें ३ लाख किलोवॅट विजेचें उत्पादन होईल. त्यांपैकी निम्मी वीज महाराष्ट्राला व निम्मी गुजरातला पुरविण्यांत येईल. वीज-निर्मिति-केंद्र उभारण्यासाठी ५० कोटी रुपये खर्च येणार असून तें पुरें होण्यास १९६४ साल उजाडेल असा अंदाज आहे. केंद्रासाठी करावयाच्या प्राथमिक तयारींपैकी बरीच तयारी झाली असून यंत्रसामुग्रीसाठी जगाच्या निरनिराळ्या भागांतून लवकरच टेंडर्स मागविण्यांत येणार आहेत. ब्रिटनमध्यें बांधण्यांत आलेल्या काल्डर हॉल पद्धतीचें केंद्रच भारतांत उभारलें जाण्याचा संभव आहे. जळण म्हणून यूरेनिअमचा उपयोग करण्यांत येणार आहे. भारताच्या अणुशक्तीमंडळानें तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत आणखी दोन अशींच केंद्रें उभारण्याची शिफारस केलेली आहे. दिल्ली विभागांत एक व मद्रास विभागांत एक अशा दोन केंद्रांना ह्यापूर्वींच तात्पुरती मंजुरी देण्यांत आलेली आहे. अणुशक्तीमंडळाच्या मतानें राजस्थानांत एक छोटें अणुशक्ति वीजकेंद्र आणि कच्छमध्यें एक केंद्र उभारण्यांत यावें असें आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस भारतांत अणुशक्तीच्या साह्यानें १० लाख किलोवॅट वीज निर्माण व्हावी असा मंडळाचा इरादा आहे.

---

## महाराष्ट्राच्या मानानें गुजरात व्यापारी पिकांचे बाबतींत अधिक संपन्न आहे

मुंबई राज्याचे विभाजन होऊन नव्यानेंच स्थापन झालेल्या महाराष्ट्र आणि गुजरात या राज्यांचीं अन्नधान्यें व इतर पिकें ह्या दृष्टीनें तुलना करतां, महाराष्ट्र राज्यांत अन्नधान्यांच्या उत्पादनाचें प्रमाण अधिक, तर व्यापारी किंवा पैसे मिळवून देणाऱ्या पिकांच्या बाबतींत गुजरात राज्याची परिस्थिति अधिक चांगली असल्याचें दिसून येतें.

पूर्वीच्या मुंबई राज्यांत होणाऱ्या अन्नधान्याच्या एकूण उत्पादनापैकी ७२.६ टक्के अन्नधान्य महाराष्ट्रांत पिकतें तर शेंगदाणा आणि कापूस या दोन महत्त्वाच्या व्यापारी पिकांपैकी गुजरातमध्यें अनुक्रमें ६४.३ व ५२.५ टक्के पीक होतें. एरंडी आणि शिरस् मोहरी या पिकांच्या बाबतींतहि गुजरात राज्यांत ९३.३ आणि ९५.५ टक्के पीक येतें.

तांदूळ, ज्वारी, नाचणी, भरड धान्यें, चणा, तूर या पिकांच्या बाबतींत महाराष्ट्र राज्याचें प्रमाण गुजरातपेक्षा बरेंच अधिक असून, बाजरी, गहूं व बार्ली या पिकांच्या बाबतींत गुजरातची परिस्थिति अधिक चांगली आहे. पैसा मिळवून देणाऱ्या पिकांच्या बाबतींत ऊंस, बटाटे, मिरच्या आणि मेस्ता या बाबतींत महाराष्ट्राची तर तंबाकू, कापूस, शेंगदाणे व तेलबिया या पिकांच्या बाबतींत गुजरात राज्याची परिस्थिति अधिक उजवी आहे.

---

# अर्थ

बुधवार, ता. १ जून, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## आशिआंतील देशांना भांडवलाची मदत द्या

अमेरिकेंतील सुप्रसिद्ध चेझ मॅनहॅटन बँकेचे अध्यक्ष मि. जॉर्ज चॅंपिअन ह्यांनीं डेट्राइट येथील ईकॉनॉमिक क्लबांत भाषण करतांना आशिआंतील कम्युनिस्ट देश सोडून इतर स्वतंत्र देशांना भांडवल पुरविण्यावर जोर दिला. अमेरिकेनें असा भांडवलपुरवठा करण्यास सध्यां अनुकूल काल आहे असा विचार प्रगट करून ते पुढें म्हणाले कीं, आर्थिक विकासाच्या कार्यांत यश मिळवावयाचें असेल तर खाजगी उद्योगधंद्यांच्या पुढाकार घेण्याच्या प्रवृत्तीला प्रोत्साहन दिलें पाहिजे ही गोष्ट आशिआंतील पुढाऱ्यांनीं ओळखलेली आहे. दक्षिण आशिआंत व आग्नेय आशिआंत आर्थिक विकासासाठी लागणारी साधन-सामग्री भरपूर प्रमाणावर आहे. तिचा उपयोग करून औद्योगिक प्रगति करण्याची इच्छा आहे आणि मजूरवर्गहि आहे. दोन गोष्टींची मात्र वाण आहे. त्या म्हणजे भांडवल आणि व्यवस्थापकीय पुढारीपण; आणि ह्या दोन्ही गोष्टी इतर कोठल्याहि देशांपेक्षा अमेरिकेजवळ अधिक विपुलतेनें आहेत. आशिआंत दौरा करून आले असतां एका बाबतींत पूर्ण खात्री झाल्याशिवाय राहत नाहीं. ह्या भागाला मदत देण्याच्या कामीं पाश्चिमात्य देशांनीं शक्य तें सर्व करण्याची अतिशय आवश्यकता आहे, हीच ती बाब. अमेरिकेनें युद्धोत्तर कालांत युरोपखंडाला आपल्या पायावर उभे करण्याचें काम केलेलें आहे. ह्या बाबतींत अमेरिकेंतील उद्योगधंदे व सरकार ह्या दोघांनींहि हातभार लावला होता. हें काम दोघांनींहि चांगल्या रीतीनें पार पाडलें.

आतां आशिआंतील देशांना मदत देण्याची पाळी आली असून मदत देण्याला काळहि चांगला अनुकूल आहे. पण संकल्पित आर्थिक मदत फक्त सरकारकडूनच मिळवून भागणार नाहीं. कारण, आर्थिक विकासाचें जें साध्य गांठावयाचें आहे तें फक्त सरकारी मदतीमुळें गांठलें जावयाचें नाहीं. खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांमधील स्पर्धेमुळें आर्थिक विकासाला जी गति मिळते ती केवळ सरकारी मदतीमुळें मिळूं शकणार नाहीं; आणि ह्याच स्पर्धेची आज आशिआच्या विकासासाठी गरज आहे. जगाच्या एका अर्धांत राहणारे आशिआनिवासी लोक अमेरिका ज्या प्रश्नांशीं झगडत आहे त्याच प्रश्नांच्या बरोबर उत्तरांचा शोध करीत आहेत. सरकारी खर्चावर परिणामकारक नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न ते करीत आहेत. चलनवृद्धीला आळा घालण्याची त्यांची सर्व तऱ्हेची खटपट चालू आहे; लोकांना अधिक चांगलें शिक्षण देण्यासाठी ते धडपडत आहेत आणि सरकारच्या बंधनामुळें लांचलुचपत आणि भ्रष्टाचार ह्यांची जी उत्पत्ति झालेली आहे व होत आहे ती थांबविण्याचा प्रयत्न ते करीत आहेत. अमेरिकेंतील कांहीं उद्योगधंद्यांनीं आपल्या तांत्रिक ज्ञानासह आशिआंत यावें अशी आशिआंतील लोकांची इच्छा आहे. त्याचप्रमाणें ह्या उद्योगधंद्यांनीं थोडेबहुत भांडवलहि घालावें असें त्यांना वाटतें. परदेशीय भांडवल आकर्षित करण्या-साठी ते गुंतविणाऱ्या लोकांना थोडीबहुत शाश्वति वाटली पाहिजे ह्याचीहि जाणीव आशिआंतील लोकांना आहे. गेल्या कांहीं वर्षांत आशिआंतील बऱ्याच देशांनीं परदेशीय भांडवलाच्या गुंतवणुकीला उत्तेजन देण्यासारखी धोरणें स्वीकारलेलीं आहेत.

---

## कंपन्यांच्या हिशेबपत्रकांची स्पर्धा

### टाटा कंपनीला बक्षिस

सर्वोत्कृष्ट रीतीनें वार्षिक अहवाल आणि हिशेबाचीं पत्रकें भागीदारांना सादर केल्याबद्दलचें बक्षिस टाटा आयर्न अँड स्टील कं. लि. ला मिळालें आहे. त्याचे खालोखाल इंडियन ऑक्सिजन लि., एअर-इंडिया इंटर नॅशनल कॉर्पोरेशन आणि मुकुंद आयर्न अँड स्टील कं. लि. ह्यांचा अनुक्रम लागला आहे. इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस ऑफ इंडियानें प्रस्तुत स्पर्धेची योजना केलेली आहे. कंपन्यांचे वार्षिक अहवाल व हिशेब ह्यांत सुधारणा घडवून आणणें, हा त्या स्पर्धेचा उद्देश आहे; इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट्स ऑफ इंग्लंड अँड वेल्स ह्या संस्थेच्या स्पर्धायोजनेचें हें अनुकरण आहे. पहिली स्पर्धा १ एप्रिल, १९५८ ते ३१ मार्च, १९५९ ह्या आर्थिक वर्षाच्या अहवाळासाठी व हिशेबासाठी होती.

---

### शेअर-होल्डरांची अ. भा. संघटना

शेअर-होल्डरांच्या प्रादेशिक व धंदेनिहाय संघटना मिळून फेडरल स्वरूपाची अ. भा. शेअर-होल्डर्स असोसिएशन स्थापन करावी अशी सूचना मध्यवर्ती व्यापार आणि उद्योग खात्यांतील कंपनी कायदा कारभाराच्या संशोधन आणि आंकडेवारी विभागाचे संचालक डॉ. राज के. निगम यांनीं केली आहे. भारतांतील शेअर-होल्डर संघटनेचें कार्य या विषयासंबंधीं त्यांनीं स्वत: होऊन पाहणी करून तयार केलेल्या अहवालांत सदर सूचना दिलेली आहे. वरील विभागानें हा अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. अशी फेडरल संघटना स्थापन झाल्यानें शेअर-होल्डर आणि सरकारी यंत्रणा यांमध्यें अधिक संबंध प्रस्थापित होण्यास तसेंच कंपन्यांचा कारभार अधिक चांगल्या प्रकारें चालण्यास साह्य होईल असें ह्या अहवालांत म्हटलें आहे.

शेअर होल्डर हा संयुक्त भांडवलाच्या कंपन्यांतील महत्त्वाचा घटक असूनहि त्यांची प्रभावी संघटना नाहीं; तर कामगार आणि व्यवस्थापकवर्ग दोघांनींहि सुसंघटित संघटना स्थापन केल्या आहेत ही गोष्टहि यामध्यें नजरेस आणण्यांत आली आहे. भारतांतील शेअर-होल्डरांची संख्या साडेचार लक्ष असली तरी सध्यांच्या चालू शेअर-होल्डरांच्या संघटनांच्या सभासदांची संख्या अगदींच कमी आहे.

---

# THE PRESIDENCY INDUSTRIAL

## BALANCE SHEET AS

| 31-12-1958 Rs. | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| | **1. Capital** | | |
| | *Authorised Capital:* | | |
| 10,00,000 | 10,000 Shares of Rs. 100/- each ... | | 10,00,000—00 |
| | *Issued Capital:* | | |
| 10,00,000 | 10,000 Shares of Rs. 100 each ... | | 10,00,000—00 |
| | *Subscribed and Paid-up Capital:* | | |
| | 10,000 Shares of Rs. 100 each | | |
| 7,50,000 | Rs. 75 per share called up ... | 7,50,000—00 | |
| 19,425 | *Less:* 259 Shares forfeited ... | 19,425—00 | |
| 7,30,575 | 9,741 | 7,30,575—00 | |
| 9,750 | *Less:* Calls unpaid ... | 9,750—00 | |
| 7,20,825 | | 7,20,825—00 | |
| 9,665 | *Add:* Forfeited shares ... | 9,665—00 | |
| 7,30,490 | | 7,30,490—00 | 7,30,490—00 |
| 20,650 | **1. A Calls received in advance:** ... | | 20,650—00 |
| 2,79,160 | **2. Reserve Fund & Other Reserves** ... | | 2,43,417—50 |
| | **3. Deposits and Other Accounts:** | | |
| 8,02,755 | (i) Fixed Deposits ... | 6,65,555—00 | |
| 10,35,824 | (ii) Savings Bank Deposits: ... | 10,47,827—36 | |
| 11,15,148 | (iii) Current Deposits and Contingency accounts etc. | 11,47,182—70 | 28,60,565—06 |
| 29,53,727 | | | |
| | **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.** | | |
| 13,75,431 | (a) In India. ... | 2,08,636—77 | |
| ... | (b) Outside India. ... | ... | 2,08,636—77 |
| 13,75,447 | | | |
| | *Particulars:* | | |
| | (i) Secured by part of banking Companies | | |
| 13,75,447 | Investment ... | 2,08,636—77 | |
| ... | (ii) Unsecured. ... | ... | |
| 13,75,447 | | | |
| 12,714 | **5. Bills Payable** ... | | 6,932—98 |
| | **6. Bills for Collection, (being Bills Receivable as per contra)** | | |
| 79,744 | (i) Payable in India ... | 34,146—66 | |
| ... | (ii) Payable outside India ... | ... | 34,146—66 |
| | **7. Other Liabilities:** | | |
| 67,624 | (1) Interest Suspense ... | 86,562—30 | |
| 10,637 | (2) Unclaimed Dividends ... | ... | |
| 33,108 | (3) Branch Adjustments ... | 17,507—90 | |
| 38,748 | (4) Other Sundry Liabilities ... | 19,432—69 | 1,23,502—89 |
| 1,50,117 | | | |
| ... | **8. Acceptances, Endorsements and Other Obligations as per contra:** ... | | 0—00 |
| | **Contingent liability:** | | |
| | **There is a claim for Rs. 7,634-08 against the Bank which is not acknowledged as a debt.** | | |
| 56,02,049 | **Total Rs.** ... | | 42,28,341—86 |

# BANK, LIMITED, POONA CITY.

**AT 31st DECEMBER 1959.**

31-12-1958

| Rs. | PROPERTY & ASSETS | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 3,54,130 | **1. Cash:** | | 2,64,855—08 |
| | In hand, with Reserve Bank and State Bank of India. | | |
| | **2. Balances with other Banks: ( In Current Account )** | | |
| 18,812 | (i) In India ... | 8,149—54 | |
| ... | (ii) Outside India ... | ... | 8,149—54 |
| ... | **3. Money at Call and Short Notice** ... | | ... |
| 22,20,419 | **4. Investments at cost :** | | 9,78,581—62 |
| 22,07,869 | (1) Securities of the Central and State Governments and other Trustee securities, including Treasury Bills of the Central and State Governments. ( Securities of the face value of Rs. 9,42,000 are with Banks against over-draft arrangement ). ( Average market value Rs. 8,57,583-65 nP. ) ... | 9,66,031—62 | |
| 12,550 | (2) Ordinary shares fully paid-up ( Realisable value Rs. 12,550/- ) ... | 12,550—00 | |
| 00-0 | (3) Debentures or Bonds ... | 0—00 | |
| 00-0 | (4) Other Investments ... | 0—00 | |
| 00-0 | (5) Gold ... ( Investments which have no market quotations have been shown at their realisable value ) | 0—00 | |
| | | 9,78,581—62 | |
| 26,01,926 | **5. Advances :** | | 25,11,235—16 |
| | ( Other than Bad and Doubtful Debts for which provision has been made to the satisfaction of the auditors ) ... | | |
| | *Loans, Cash Credits, Overdrafts, etc.* | | |
| 25,79,625 | (i) In India ... | 25,05,245—96 | |
| ... | (ii) Outside India ... | 0—00 | |
| | | 25,05,245—96 | |
| | *Bills, Discounted and Purchased* ( Excluding Treasury Bills of Central and State Governments. ) | | |
| 22,301 | (i) Payable In India ... | 5,989—20 | |
| ... | (ii) Payable outside India ... | 0—00 | |
| 26,01,926 | | 25,11,235—16 | |
| | **Particulars of Advances :—** | | |
| 12,40,931 | (1) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured ... | 11,19,161—42 | |
| 9,93,914 | (2) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security ... | 10,40,020—23 | |
| 10,246 | (3) Debts considered good, secured by personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the debtors ... | 11,318—12 | |
| 3,56,835 | (4) Debts considered doubtful or bad, not provided for. | 3,40,735—39 | |
| 26,01,925 | | 25,11,235—16 | |
| Nil | (5) Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | Nil | |
| Nil | (6) Debts due by Companies or Firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents, or in the case of private companies as Members ... | Nil | |
| Nil | (7) Maximum total amount of advances including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | Nil | |
| 51,95,287 | Carried Over ... | | 37,62,821—40 |

# THE PRESIDENCY INDUSTRIAL

BALANCE SHEET AS

## *PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ended 31st December, 1959*

| 31-12-1958 Rs. | EXPENDITURE | | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 1,45,838 | 1. Interest paid on Deposits, Borrowings etc. ... | | 1,23,172—05 |
| | 2. Salaries, Allowances, and Provident Fund: | | |
| 7,200 | (1) Manager | 8,400—00 | |
| 62,907 | (2) Others | 64,196—55 | 72,596—55 |
| | 3. Directors' and Local Committee Members' Fees: | | |
| 0 | (1) Fees | 0—00 | |
| 959 | (2) Allowances (Travelling Expenses) | 1,427—80 | 1,427—80 |
| 5,156 | 4. Rent, Taxes, Insurance, Lighting etc. ... | | 5,177—08 |
| 4,372 | 5. Law Charges. ... | | 2,091—61 |
| 974 | 6. Postage, Telegrams and Stamps ... | | 713—49 |
| 1,200 | 7. Auditors' Fees ... | | 1,200—00 |
| 5,353 | 8. Depreciation on and Repairs to the Baking Company's Property ... | | 5,775—48 |
| 8,161 | 9. Stationery, Printing, Advertisement, etc. ... | | 5,086—88 |
| 1,905 | 10. Loss from sale of or dealings with Non-Banking assets ... | | 2,314—97 |
| 8,951 | 11. Other Expenditure: ... | | 10,075—31 |
| 2,52,981 | Total Rs. ... | | 2,29,631—22 |

| Rs. | INCOME (Less Provision made during the year for Bad and Doubtful Debts and other usual or necessary provisions.) | Rs. nP. |
|---|---|---|
| 1,77,188 | 1. Interest and Discount. ... | 1,45,092—75 |
| 4,911 | 2. Commission, Exchange, Brokerage. ... | 4,692—27 |
| 360 | 3. Rent ... | 360 |
| 0 | 4. Net Profit on sale of Investments, Gold, Silver, Land, premises and other Assets (not credited to Reserve or any particular Fund or Account.) ... | 0—00 |
| 0 | 5. Net Profit on Revaluation of Investments, Gold, Silver, Land, Premises and other Assets (not credited to Reserve or any particular Fund or Account.) ... | 44,540—00 |
| 3,709 | 6. Income from Non-Banking assets and Profit from sale of or dealing with such assets ... | 3,709—44 |
| 69 | 7. Other Receipts: ... | 20—00 |
| 66,744 | 8. Loss: ... | 31,216—76 |
| 2,52,981 | Total Rs. ... | 2,29,631—22 |

### AUDITORS' REPORT TO THE SHARE-HOLDERS

We have audited the annexed Balance Sheet of the Presidency Industrial Bank, Limited Poona as at 31st December, 1959 and also the annexed Profit and Loss Account of the Bank for the year ended on that date in which are incorporated the returns of Bombay Branch audited by us.

In accordance with the provisions of Section 29 of the Banking Companies Act, 1949, read with the provisions to Sub-section (1) and (2) of Section 211 and Sub-section (5) of Section 211 and Section 227 (5) of the Companies Act. 1956, the Balance Sheet and Profit and Loss Account are not required to be and are not drawn up in accordance with the Sixth Schedule of the Companies Act, 1956. The Accounts are, therefore, drawn up in conformity with Forms A and B of the Third Schedule to the Banking Companies Act, 1949,

We report that:—

(a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory.

(b) The transactions of the Bank which have come to our notice, have been within the powers of the Bank.

(c) In our opinion, proper books of accounts as required by Law have been kept by the Bank so far as appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit have been received from the Bombay Branch of the Bank.

(d) The Bank's Balance Sheet and the Profit and Loss Account dealt with by this report are in agreement with the books of account and returns.

(e) In our opinion, and to the best of our information and according to the explanations given to us, the said accounts give the information required by the Companies Act, 1956 in the manner so required for Banking Companies and on such basis the side Balance Sheet gives a true and fair view of the state of affairs of the Bank as at 31st December, 1959, and the Profit and Loss Account gives a true and fair view of the loss for the year ended upon that date.

Poona City,
Dated 10th February, 1960.

B. C. ABHYANKAR & Co.,
*Chartered Accountants.*

# BANK, LIMITED, POONA CITY.

**AT 31st DECEMBER 1959.**

| 31-12-1958 Rs. | PROPERTY & ASSETS | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 51,95,287 | Brought Forward ... | | 37,62,821—40 |
| | (8) Maximum total amount of advances including temporary advances granted during the year to the Companies or Firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners, or Managing Agents, or in the case | | |
| Nil | of private Companies, as Members. ... | Nil | |
| Nil | (9) Due from Banking Companies ... | Nil | |
| | **6. Bills Receivable, Being Bills for Collection as per contra:** | | |
| 79,745 | (i) Payable in India ... | 34,146—66 | |
| ... | (ii) Payable outside India ... | 0—00 | 34,146—66 |
| | **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and Other Obligations as per contra** ... | | ... |
| | **8. Bank's Premises:** | | |
| | (Revalued on 31-12-1959 increasing thereby the written down value by Rs. 44,540) ... | 69,553—87 | |
| 16,630 | Less : Depreciation written off ... | 8,713—87 | 60,840—00 |
| | **9. Furniture, Fixtures and Library:** | | |
| | Cost as per last Balance Sheet ... | 41,567—49 | |
| | Additions during the year ... | 13—50 | |
| | | 41,580—99 | |
| | Less : Sales during the year ... | 180—00 | |
| | | 41,400—99 | |
| 19,559 | Less : Total depreciation written off ... | 23,291—47 | 18,109—52 |
| | **10. Other Assets Including Silver:** | | |
| 20,601 | (1) Interest accrued on Investments ... | 9,223—56 | |
| 12,753 | (2) Printing and Stationery on hand ... | 10,980—00 | |
| 1,518 | (3) Deposit with Tel. & Elec. Co. ... | 1,374—00 | |
| 37,154 | (4) Income-tax paid in advance and at source ... | 60,713—15 | |
| 9,568 | (5) Legal expenses pending adjustments ... | 13,324—92 | |
| 238 | (6) Stamps on hand ... | 190—75 | |
| 3,293 | (7) Balance in current account with Co-op. Banks... | 642—47 | |
| 1,154 | (8) Outstanding debtors ... | 607—74 | |
| ... | (9) Suspense Account ... | 46—00 | 97,102—59 |
| 86,279 | | | |
| 68,914 | **11. Non-Banking Assets Acquired in Satisfaction of Claims** ... | | 88,470—00 |
| | **12. Profit and Losss Account:** | | |
| | Less as per last Balance Sheet ... | 1,35,634—93 | |
| 1,35,635 | Add : Loss for the year as per annexed statements ... | 31,216—76 | 1,66,851—69 |
| 56,02,049 | Total Rs. ... | | 48,28,341—86 |

**B. Y. Pathak,** *Accountant.*

**G. D. Joglekar,** *Manager*

**C. D. Joshi** *Chairman.*
**G. U. Chitale** *Vice-Chairman*
**C. T. Chitale**, **W. P. Vaidya**, **S. K. Bhagwat** } *Directors.*

**Shri G. R. Sathe being sick and Shri V. N. Sardesai and Shri Mohanlal Hansraj being out of station did not sign.**

# THE PRESIDENCY INDUSTRIAL BANK, LIMITED, POONA.

*(Registered on 19th November, 1936)*

## TWENTY-THIRD REPORT OF THE DIRECTORS

The Directors beg to submit to the Share-holders, the audited Balance Sheet and Profit and Loss Account for the year ended 31st December. 1959. The Auditors' Report is also annexed.

During the year under report, there is a net loss of Rs. 31,216-76 after taking credit, in the Profit and Loss Account for appreciation of Rs. 44,540/- in the value of the Bank's premises supported by valuation Report. This loss brings the accumulated loss as at 31st December 1959 to Rs. 1,66,851-69. Against this it may be noted that there is a credit balance of Rs. 86,562-30 in the Interest Suspense account.

During the year, securities of the face value of Rs. 12,58,000/- have been sold and the proceeds thereof have been utilised toward reducing the Borrowings from other Banking Companies. This sale has resulted in reducing the gap between the market value and the Book value of the investments to Rupees 1,07,450/- from Rs. 1,74,982/- in the last year's Balance Sheet. This sale has also helped in reducing the amount of interest on Borrowings from Banks and will also help in future.

Under section 256 of the Companies Act three of the Directors, Shri G. R. Sathe, Shri G. U. Chitale and Shri W. P. Vaidya retire by rotation. The retiring Directors are eligible for re-election and offer themselves for the same.

Shri C. D. Kataria who was co-opted under article 104 of the Company has since resigned.

The Share-holders are requested to appoint Auditor or Auditors and to fix his or their remuneration.

The Board takes this opportunity for offering their thanks to the Manager and his staff for their efficient and honest services to the Bank.

C. D. JOSHI,
*Chairman*


**भारतीय बोलपटाची कुचेष्टा**—कॅनेस येथील आंतरराष्ट्रीय चित्रपटमहोत्सवांत भारतानें 'श्रृंगार' ह्या नांवाचा एक छोटा चित्रपट पाठविला होता. हा चित्रपट भारत सरकारच्या माहिती-खात्यानें तयार केला असून त्यांत स्त्रियांच्या केशरचनेचे प्रकार दाखविण्यांत आले आहेत. चित्रपट पहातांना प्रेक्षकांनीं त्याची कुचेष्टा केली. इतर अनेक चांगले छोटे बोलपट असतांना हाच चित्रपट कां पाठविण्यांत आला, अशी पृच्छा करण्यांत येत आहे.

**सुरतगड येथील सरकारी शेत**—सुरतगड येथील सरकारी मालकीच्या विस्तीर्ण शेतासाठी रशियांतून खास ट्रॅक्टर्स मागविण्यांत आले आहेत. हे ट्रॅक्टर्स कपाशीच्या लागवडीसाठी उपयोगी पडतील असे असतील. अशा प्रकारचे कांहीं ट्रॅक्टर्स ह्या शेतावर पूर्वी वापरण्यांत आले असतां त्यांचा फार चांगला उपयोग होतो असें आढळून आलें आहे.

**मध्यप्रदेशांतील शिक्षणप्रसार**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत मध्यप्रदेश सरकार राज्यांतील प्राथमिक व दुय्यम शिक्षणावर ३०·५ कोटी रुपये खर्च करणार आहे. शिक्षणप्रसाराच्या योजनांवर एकूण ४५ कोटी रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. तांत्रिक शिक्षण देणाऱ्या २२ नव्या संस्था काढण्यांत येतील. त्यापैकी ५ कॉलेजें असतील.

**रशिअन प्रवाशांची तुकडी**—रशिआंतील शिक्षणतज्ज्ञांची, शास्त्रज्ञांची व ग्रंथकारांची एक तुकडी शांततेचा प्रचार करण्यासाठी निघाली आहे. कांहीं दिवसांपूर्वी २८६ जणांची ही तुकडी मुंबईला येऊन गेली. हे सर्व प्रवासी एका विलासी बोटींतून प्रवास करीत आहेत. अशा प्रकारची रशिअन बोट मुंबईला येण्याची ही पहिलीच खेप आहे.

**प्राचीन हस्तलिखितांचें जतन**—प्राचीन व दुर्मीळ हस्तलिखितांचें जतन करण्यासाठी व त्यावर आधारलेलीं प्रकाशनें छापण्यासाठी एक योजना राजस्थान सरकारनें मंजूर केली आहे. त्याचप्रमाणें ह्या हस्तलिखितांचा अभ्यास करून संशोधन करणाऱ्या विद्वानांसाठी एक वसतिगृहहि सरकार बांधणार आहे.

**कॅनडाकडून गहूं घेण्याचा करार**—कॅनडाकडून ७,३५,००० बुशेल्स गहूं मामुली व्यापारी पद्धतीनें घेण्याची तयारी भारतानें दर्शविली आहे. अमेरिका आपला शिलकी गहूं भारताला विकण्याची खटपट करीत असतां ही तयारी दाखविण्यांत आली आहे. गेल्या वर्षी कॅनडानें भारताला कोलंबो योजनेप्रमाणें अगर कर्जाऊ म्हणून ९९,६०,००० बुशेल्स गहूं पुरविला होता.

**धान्य सांठविण्यासाठी गुदामे**—अन्नधान्याचा सांठा करण्यासाठी गुजरात सरकारनें बरीच गुदामे बांधण्याचें ठरविलें आहे. प्रत्येक तालुक्यांत एक, ह्याप्रमाणें तीं बांधण्यांत येणार असून प्रत्येक गुदामांत २०,००० पोतीं रहातील इतकीं मोठीं तीं असतील. प्रथम अहमदाबाद जिल्ह्यांत अशी पांच गुदामें बांधण्यांत येतील. धान्याच्या किंमती स्थिर राखण्यासाठी हा उपक्रम करण्यांत येत आहे.

**सुजाता बोलपटाचें स्वागत**—कॅनेस येथील आंतरराष्ट्रीय चित्रपटमहोत्सवांत अस्पृश्यतेवर आधारलेला "सुजाता" हा विमल रॉय ह्यांचा बोलपट पाठविण्यांत आला होता. एकंदरीनें प्रेक्षकांनीं त्याचें स्वागत केलें. पण युरोपमध्यें अस्पृश्यता नसल्यामुळें त्याचा ठसा तेथील जनमनावर भारताइतका उठला नाहीं; शिवाय कथानकांतील घटना फार हळु घडतात असेंहि मत व्यक्त करण्यांत आलें.

**महाबळेश्वरचा पाणीपुरवठा**—महाबळेश्वरला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणारी योजना पुरी होत आली आहे. येत्या ऑक्टोबरपासून शहराला नळानें पाणी पुरविण्यांत येऊं लागेल. पाण्याचा सांठा करण्यासाठी एक दुसरें तळेंच निर्माण करण्यांत आलें आहे. त्यांत पावसाचें पाणी सांठविण्यांत येईल. योजनेला १२ लाख रुपये खर्च लागेल.

**१०८° ताप येऊनहि जिवंत**—कलकत्ता येथील एका इस्पितळांत एका रोग्याला १०८ फॅरनहाइट ताप येऊनहि तो जिवंत राहिला. उपचारानें त्याचा ताप उतरला व आतां तो सुधारत आहे. इतका ताप चढल्यावर रोगी वाचत नाहीं. हा प्रकार अजबच गणला जात आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.